संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पात्र अतिक्रमक व आदिवासी पाडे, यांचे पुनर्वसन जलदगतीने करणेकामी उच्चस्तरीय सशक्तता समितीची स्थापना.

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : डब्ल्युएलपी-१२१७/प्र.क्र.३०३/फ-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- २० फेब्रुवारी, २०१८

प्रस्तावना :-

मा. उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका ३०५/१९९५ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक ०७/५/१९९७ व दिनांक १७/०७/१९९९ मध्ये पारित केलेल्या आदेशानुसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील दिनांक ०१.०१.१९९५ पूर्वीच्या अतिक्रमकांचे उद्यानाबाहेर पुनर्वसन करावयाचे आहे. सदर पात्र अतिक्रमकांचे पुनर्वसन SRA मार्फत चांदिवली येथे करण्यात येत असून, सदर क्षेत्र aircraft landing strip च्या funnel zone मध्ये येत आहे. त्यामुळे सदर क्षेत्रात इमारत बांधकामाच्या उंचीवर बंधन असल्याने पुनर्वसनाची प्रक्रिया रखडली आहे. परिणामी पात्र अतिक्रमकांच्या पुनर्वसनासाठी पर्यायी जागेचा शोध घेणे आवश्यक आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या काही क्षेत्रामध्ये सद्यस्थितीत आदिवासी पाडे सुध्दा आहेत. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार निश्चित करण्यात आलेले पात्र अतिक्रमक व आदिवासी पाडे यांचे पुनर्वसनाचे नियोजन व पुनर्वसनाकरिता लागणाऱ्या पर्यायी जागेची निश्चितीबाबत निर्णय घेण्याकरिता उच्चस्तरीय सशक्तता समिती गठीत करण्याची बाब शासनाचे विचाराधीन होती. तदनुषंगाने शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे:-

शासन निर्णय :-

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पात्र अतिक्रमक व आदीवासी पाडे यांचे पुनर्वसनाचे नियोजन व पुनर्वसनाकरिता पर्यायी जागा निश्चित करणेच्या अनुषंगाने खालील प्रमाणे उच्चस्तरीय सशक्तता समिती गठीत करण्यात येत आहे :-

१.	मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई	:- अध्यक्ष
२.	मा. अपर मुख्य सचिव, (गृह निर्माण विभाग), मंत्रालय, मुंबई	:- सदस्य
३.	मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग (१), मंत्रालय, मुंबई	:- सदस्य
४.	सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई	:- सदस्य
५.	प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर	:- सदस्य
६.	अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम, मुंबई	:- सदस्य
७.	मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई.	:- सदस्य
८.	उपाध्यक्ष, महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, मुंबई.	:- सदस्य
९.	मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरवली	:- सदस्य सचिव

२. उपरोक्तप्रमाणे गठीत उच्चस्तरीय सशक्तता समितीने संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदीवासी पाडे व पात्र अतिक्रमक यांचे पुनर्वसनाचे नियोजन व पुनर्वसनाकरिता पर्यायी जागा निश्चित करणेच्या अनुषंगाने वेळोवेळी बैठका घेऊन कार्यवाही करावी.

३. सदर समितीची कामाची व्याप्ती खालीलप्रमाणे राहील :-

१. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पात्र अतिक्रमक व आदीवासी पाडे यांचे पुनर्वसनाचे नियोजन व पुनर्वसनाकरिता पर्यायी जागा निश्चित करेल.
२. क्षेत्रीय स्तरावर पुनर्वसनासंबंधी चालू असलेल्या कामाचा आढावा घेतील.
३. क्षेत्रीय स्तरावर असलेल्या अडचणी दुर करण्यासाठी मंत्रालय स्तरावर पाठपुरावा करेल व त्यासंबंधी निर्देश क्षेत्रीय स्तरावर पाठवेल.
४. पुनर्वसनासंबंधित आंतरविभागीय अडचणी दूर करेल.
५. पुनर्वसना संबंधीत आर्थिक बाबी व वैधानिक बाबींबाबत मार्गदर्शन करेल.
६. आवश्यकतेनुसार क्षेत्राला भेट देवून प्रशासनाच्या अडचणी दूर करेल

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२२०१२०२४६८११९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, cn=Virendra R Tiwari
Date: 2018.02.20 12:03:54 +05'30'

(वीरेन्द्र तिवारी)
मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय),
महसूल व वन विभाग.

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. अपर मुख्य सचिव, (गृह निर्माण विभाग), मंत्रालय, मुंबई
३. मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग (१), मंत्रालय, मुंबई
४. सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई.
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई
८. उपाध्यक्ष, महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, मुंबई
९. मुख्य वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरवली
१०. फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई /निवड नस्ती.